स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड – ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.
Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

**ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION**

Phone: (02462) 229542
Fax : (02462) 229574
Website: www.srtmun.ac.in
E-mail: bos.srtmun@gmail.com

## :: परिपत्रक ::

या परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांतील N.C.C., N.S.S., Sports व इतर Extra Curriculum activities या करीता विद्यापीठाच्या परवानगीने सहभागी होणा–या विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश सवलत देण्याबाबत मा.विद्या परिषदेच्या दि.२२.०८.२०१६ च्या बैठकीत ठराव क्र.०५ अन्वये निर्णय घेण्यात आलेला आहे. त्याबाबत सोबत नियमावली देण्यात येत आहे. तरी, सदर परिपत्रक व नियमावलीतील निकषा प्रमाणे पात्र विद्यार्थ्यास सवलत देण्यात यावी.

सदरील परिपत्रकाची प्रत विद्यापीठाच्या **www.srtmun.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी सदरील बाब ही सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

'ज्ञानतीर्थ' परिसर, )(
विष्णुपुरी, नांदेड. )(
जा.क्र.: शैक्षणिक/०१/BOS/ )(
Ext.curr.act/२०१६–१७/१२०९ )(
दिनांक : १५.०९.२०१६. )(

स्वा/–
**संचालक**
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव
१) मा. कुलसचिव यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. परीक्षा नियंत्रक यांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ
३) मा. प्राचार्य, संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
४) उपकुलसचिव, पदव्युत्तर विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
५) साहाय्यक कुलसचिव, पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.
६) सिस्टम एक्स्पर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ.

Scanned by CamScanner

③

# नियमावली

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संदर्भ:— परीपत्रक क्र: शैक्षणिक/०१/२०१६—१७/१२०९ दि. १५.०९.२०१६, NCC,NSS,Sports व इतर विद्यार्थी करीता.

प्रस्तुत परिपत्रकान्वये सर्व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, मा. विद्यापरिषदेची छत्तीसावी बैठक दिनांक २२/०८/२०१६ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीतील ऐनवेळचा विषय क्र. ०५/३७ — २०१६ नुसार (यु. जी. सी. नवी दिल्लीच्या दिनांक २२/०८/२०१६ रोजीच्या पत्राला अनुसरून) विद्यार्थी कल्याण विभाग, क्रीडा विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना या विभागांच्या अंतर्गत चालणा—या विविध उपक्रमात सहभागी होणा—या प्रस्तुत विद्यापीठातील सर्व विद्याशाखेतील विद्यार्थी/विद्यार्थीनींना विशेष बाब म्हणून कॅरीऑनची सवलत प्रस्तुत परिपत्रकात नमुद केलेल्या नियम व अटींना अनुसरुन देय राहील.

**अ) विद्यार्थी कल्याण विभाग** : आंतर विद्यापीठ राज्यस्तरीय युवक महोत्सव (इंद्रधनुष्य — मा. राज्यपाल भवन आयोजित) आंतर विद्यापीठ पश्चिम विभागीय युवक महोत्सव, आंतर विद्यापीठ राष्ट्रीय युवक महोत्सव, आंतरराष्ट्रीय युवक महोत्सव इत्यादी स्पर्धेत स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडचे प्रतिनिधीत्व करणारे सर्व स्पर्धक विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी.

**ब) क्रीडा विभाग** : आंतरराष्ट्रीय, अखिल भारतीय व पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा, क्रीडा महोत्सव (मा. राज्यपाल भवन आयोजित) इत्यादी स्पर्धेत स्वा.रा.ती. म. विद्यापीठ, नांदेडचे प्रतिनिधीत्व करणारे सर्व खेळाडू विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी.

**क) राष्ट्रीय सेवा योजना (NSS)** :

१) राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन (SRD), राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन (NRD) (स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडचे प्रतिनिधीत्व करणारे सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी.

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग रा. से. यो. कक्ष मंत्रालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील विविध विद्यापीठांर्गत आयोजित विविध राज्यस्तरीय शिबीरातील सहभागी विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी.

३) उच्च व तंत्र शिक्षण विभाग रा. से. यो. कक्ष मंत्रालय, मुंबई व रा. से. यो. प्रादेशिक कार्यालय, पुणे व विविध राज्याचे रा. से. यो. प्रादेशिक कार्यालय आणि युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध राष्ट्रीय पातळीवरील शिबीरातील सहभागी विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी .

**ड) राष्ट्रीय छात्र सेना (NCC)** :

१) राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन (SRD), राष्ट्रीय प्रजासत्ताक दिन पथसंचलन (NRD) (स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेडचे प्रतिनिधीत्व करणारे सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनी .

२) विविध राज्यस्तरीय/राष्ट्रीय पातळीवरील शिबीरात सहभागी विद्यार्थी/विद्यार्थीनींसाठी.

Scanned by CamScanner

②

अटी व नियम :

i) उपरोक्त विभागील उपक्रमात सहभागी असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनी पदवीच्या प्रथम वर्षात अनुत्तीर्ण झाल्यास त्यास पदवीच्या द्वितीय वर्षात प्रवेश दिला जाईल.

ii) उपरोक्त विभागील उपक्रमात सहभागी असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनी पदवीच्या प्रथम व द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण झाल्यास त्यास पदवीच्या तृतीय वर्षात प्रवेश दिला जाईल. तथापि पदवी तीन वर्षाची असेल तर प्रथम वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय तृतीय वर्षाच्या अंतिम सत्रातील परीक्षेला संबंधित विद्यार्थ्यास/विद्यार्थीनीस पात्र समजले जाणार नाही.

iii) उपरोक्त विभागील उपक्रमात सहभागी असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनी यांची पदवी चार किंवा पाच वर्षाची असल्यास संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनी पदवीच्या कालावधीत मागील सलग दोन वर्ष अनुत्तीर्ण असेल तर त्यास पदवीच्या पुढील वर्षात प्रवेश दिला जाईल. उदा. पदवीच्या प्रथम वर्षात उत्तीर्ण आहे परंतु द्वितीय व तृतीय वर्षात अनुत्तीर्ण आहे. अशा विद्यार्थ्यास पदवीच्या चौथ्या वर्षात प्रवेश देय राहील.

iv) उपरोक्त विभागील उपक्रमात सहभागी असलेला विद्यार्थी/विद्यार्थीनी सलग दोन वर्ष अनुत्तीर्ण असेल तर त्यास पदवीच्या पुढील वर्षात प्रवेश दिला जाईल. परंतु दोन्ही वर्षापैकी पहिल्या वर्षाची परीक्षा उत्तीर्ण झाल्याशिवाय अंतिम वर्षातील शेवटच्या सत्रातील परीक्षेला संबंधित विद्यार्थी/विद्यार्थीनी पात्र असणार नाही.

v) सदर परिपत्रकास अनुसरून आपल्या महाविद्यालयातील सर्व विद्याशखेतील उपरोक्त उपक्रमांत सहभागी होणा—या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह विद्यार्थी कल्याण/क्रीडा विभाग/रा.से. योजना, राष्ट्रीय छात्र सेना संबंधित विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांच्याकडे परिपत्रकाच्या अनुषंगाने प्राचार्यांच्या शिफारशीसह विहीत मुदतीत सादर करावेत.

vi) सदरील परिपत्रकाप्रमाणे संलग्नित सर्व महाविद्यालयांकडून प्रस्तुत विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण/क्रीडा विभाग/रा.से. योजना, राष्ट्रीय छात्र सेना या संबंधित विभागांना प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर त्यांची छाननी करून पात्र विद्यार्थी/विद्यार्थीनींची नावे परीक्षा विभाग व संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित केले जातील.

Scanned by CamScanner